शिवळे महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

जनसेवा शिक्षण मंडळाचे शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे व महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय पुणे यांच्या शासन परिपत्रकानुसार 14 जानेवारी ते 27 जानेवारी या दरम्यान 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करणे अनिवार्य आहे. त्यानिमित्ताने  महाविद्यालयतील मराठी वाङ्मय मंडळ आयोजित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रश्नमंजुषा , शुद्धलेखन , हस्ताक्षर स्पर्धा, अर्जलेखन स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा ,काव्य लेखन व कथालेखन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. जी. आर. विशे , मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय चिताळकर, मराठी वाड्.मय मंडळ प्रमुख डॉ. संदीप चपटे, डॉ. एल. आर. संते,  प्रा. पवन रोठे , डॉ. पी .बी. भास्कर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अनेक विद्यार्थी सहभागी झाल्याने या स्पर्धा  मोठ्या उत्साहाने  पार पडल्या.